INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

# ब्रिटिशकालीन औद्योगिकीकरण आणि चंद्रपुरचे नागरी रुपांतर

# (१८६८ - १९४७)

संशोधक विद्यार्थिनी
कु जिज्ञासा प्रभाकर लोडे
इतिहास विभाग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापिठ, नागपूर
Email :- jidnyasal10@gmail .com

सह लेखक
डॉ. सुरेश एन. काळे
एम ए (इतिहास), पीएच. डी. (इतिहास)
इतिहास विभाग प्रमुख
प्राध्यापक, संशोधक व मार्गदर्शक
एच बी टी कला व वाणिज्य महाविद्यालय ताजाबाद शरीफ,
उमरेड रोड, नागपूर 24

## सारांश (Abstract)

चंद्रपूर हे विदर्भातील ऐतिहासिक दृष्ट्या आणि औद्योगिक दृष्ट्या महत्वाचे शहर आहे. ब्रिटिश आगमनानंतर या भागात औद्योगिक दृष्ट्या मोठा बदल झाला. यात नैसर्गिक साधनांची उपलब्धता, मुख्य म्हणजे कोळसा खाणी, यामुळेच चंद्रपूर शहराच्या औद्योगिक विकासाला चालना मिळाली उद्योगधंद्यांच्या वाढीमुळे लोकसंख्या स्थलांतर कामगार वस्त्यांची निर्मिती आणि शहराच्या परिसरात वाढ झाली.

Received: 03-03-2026 | Accepted: 08-04-2026 | Published: 16-04-2026 | www.ijeml.com

प्रस्तुत संशोधन लेखात औद्योगिकरणामुळे चंद्रपुर शहरावर सामाजिक आर्थिक व भौगोलीक बाबीत झालेल्या बदलांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. या अभ्यासातून औद्योगिक विकास व नागरीकरण यांचा संबंध स्पष्ट होतो

# किवर्ड (महत्वाचे शब्द)-

चंद्रपूर, औद्योगिकीकरण, नागरिकरण, कोळसा उद्योग, ब्रिटिशकालीन विकास.

# प्रस्तावना -

नागरीकरण ही केवळ लोकसंख्येची शहरी भागात वाढ होण्याची प्रक्रिया नसून ती आर्थिक संरचनेतील बदल, सामाजिक रुपांतरे, सामाजिक प्रशासकीय पुनर्रचना आणि पर्यावरणीय परिणाम यांचा एकत्रित इतिहास असतो पण औद्योगिक विकास लोकसंख्येची वाढती घनता व सामाजिक परिवर्तन या सर्वांचा नागरिकरणाशी खूप निकडचा संबंध येतो.

भारताच्या औद्योगिक विकासात ब्रिटिशांचा खूप मोठा वाटा दिसून येते. खरतर अनेक शहराच्या नागरिकरणाची सुरुवात ब्रिटिश शासनाच्या काळापासून झाली असे निदर्शनास येते ब्रिटिशांनी भारतातील नैसर्गिक संसाधनाचा वापर करून औद्योगिक प्रगतीला चालना दिली

विदर्भातील चंद्रपूर हे शहर नैसर्गिक संसाधनाच्या दृष्टीने अत्यंत समृध्द होते विशेषता कोळसा खाणींच्या आधारावर औद्योगिक विकासाला गती मिळाली ब्रिटिश काळात कोळसा उद्योगाच्या विकासामुळे शहराचे आर्थिक महत्त्व वाढले व नगराच्या नागरी विकासाच्या प्रवाहाला सुरुवात झाली.

# चंद्रपूर शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

चंद्रपूर जिल्ह्याचा इतिहास प्राचीन काळापासून महत्त्वाचा मानला जातो इ. स. १८५५ मध्ये येथील भोसले यांची सत्ता खालसा झाल्याबरोबर येथे नगर संस्था अस्तित्वात यावयास हवी होती पण इ. स. १८५७ च्या उठावाचे पडसाद चंद्रपूर मंडळीतही पडले होते. बाबुराव राजगोंडांच्या उठावाने इंग्रजी राज्यसत्ता डगमळु पाहत होती. तिला स्थिर करण्यातच ब्रिटिश अधिकाऱ्यांचा

INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

१८६३ पर्यंतचा काळ निघून गेला. इ. स. १८६४ मध्ये चंद्रपूर उर्फ चांदा जिल्ह्यावर कॅप्टन एच. एफ. वॉडीन्टन ची डेप्युटी कमिशनर म्हणून नेमणूक झाली आणि चंद्रपूर सुभ्याचे चंद्रपूर जिल्ह्यात रूपांतर झाले. इंग्रजी उच्चारानुसार चंद्रपूरचा चांदा जिल्हा असे नवीन नाव धारण करून पुढे प्रसिद्धीस आला. सुरुवातीला शहराची रचना ही किल्ल्याच्या सभोवताल होती आणि किल्याचा विस्तार मर्यादित स्वरूपाचा होता.

ब्रिटिशांच्या आगमनानंतर शहराचे प्रशासकीय रचना बदलली. ब्रिटिशांनी आधुनिक प्रशासनाची व नगर व्यवस्थेची सुरुवात केली. त्यांनी सुरू केलेल्या औद्योगीकरणाचा सुद्धा विकास होऊ लागला १७ मे १८६७ ला नगरपालिकेची स्थापना झाली आणि नागरी सुधारणेच्या विकासाचा प्रारंभ झाला

# ब्रिटिशकालीन औद्योगीकरण

ब्रिटिशांचा प्रारंभपासूनच व्यापार व उद्योगावर विशेष भर होता. पुढील काळात त्यांनी औद्योगीकरणाला प्रोत्साहन देण्याला प्रारंभ केला. त्यांनी भारतातील नैसर्गिक संसाधनाचा वापर करून उद्योगधंद्यांचा विकास करण्यास प्रारंभ केला.

चंद्रपूरचा परिसर दगडी कोळशाच्या देणगीने संपन्न आहे. सर्वप्रथम याचा शोध वरोरा नगरीत लागला. ती खाण १९२४ -१९२५ पर्यंत चालू होते. पण १९१४ पर्यंत रेल्वे बल्लारपूर पर्यंत घेऊन पोहोचल्याने पुढे बल्लारपूर येथे दगडी कोळशाचा शोध लागून ती खान सुरू झाली. त्यानंतर खास चंद्रपूरच्या हिंदुस्तान लालपेठ कॉलरी, महाकाली कॉलरी, रयतवारी कॉलरी आहेत. तसेच आगपेटयांचा कारखाना १९४० ते १९४६-१९४७, काच कारखाना, चंद्रपूर कवेलु याशिवाय अनेक छोटे-मोठे उद्योग मोठ्या प्रमाणात सुरू होते. खरतर कोळसा खानीमुळे रेल्वे मार्गाचा विस्तार झाला. त्यामुळे इतर वस्तूंची ने-आण करणे सोपे झाले आणि वरील सर्व उद्योगांना चालना मिळाली. चंद्रपूर शहराच्या आर्थिक व सामाजिक विकासाला वेग मिळाला

# नागरी रूपांतर प्रक्रिया

Received: 03-03-2026 | Accepted: 08-04-2026 | Published: 16-04-2026 | www.ijeml.com

औद्योगीकरणामुळे उद्योगधंद्यात वाढ झाले त्यामुळेच रोजगाराच्या नवीन संधी निर्माण झाल्या. इ, स. १९६७ साल उजाडले आणि चक्र शीघ्र गतीने फिरू लागले. त्यांनी पहिले पाऊल म्हणून १९६७ म्युनिसिपल कमिटीची मुहूर्तमेढ रोवल्या गेली, त्यानंतर कोळसा उद्योगासाठी रेल्वेचे जाडे पसरले गेले, त्याचा फायदा स्थानिक लोकांना सुद्धा झाला, अनेक स्थानिक उद्योगांची वाढ झाली. त्यामुळे बाजारपेठेंची वाढ, सेवा क्षेत्राचा विकास झाला. शहराच्या लोकसंख्येवर या सर्व बाबींचा परिणाम पडला. औद्योगीकरणामुळे चंद्रपूर शहराच्या नागरिकरणाच्या रचनेत बदल झाला. १८५५ मध्ये हे शहर फक्त आठ नगरात विभागले होते , १९६० पर्यंत या नगराची संख्या जवळपास २१ करण्यात आली.

नागरी रूपांतर झाले याचा अर्थ फक्त त्या भागातील लोकसंख्येचा जास्त संबंध आहे असं नाही त्यासोबत आर्थिक संरचनेत देखील मोठा बदल झाला. म्हणजे सुरुवातीला स्थानिक महसूल व्यवस्थेवर अवलंबून असणारी अर्थव्यवस्था नंतरच्या काळात शहरात बहेरुन येणाऱ्या वस्तूवर देखील कर लादण्यात आले. तसेच प्रशासकीय स्वरूपात दिवसेनदिवस बदल होत गेले. एकंदरीत चंद्रपूरच्या नागरिकांची प्रक्रिया निरंतर सुरू झाली.

## लोकसंख्या वाढ आणि स्थलांतर

ब्रिटिशांच्या औद्योगिकीकरणामुळे चंद्रपुरातच नाही तर संपूर्ण भागात मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. कोळसा खाणी, रेल्वे व्यवस्था आणि इतर उद्योगधंद्यांच्या वाढीमुळे ग्रामीण भागातील लोक रोजगाराच्या शोधात चंद्रपूर शहराकडे येऊ लागले. त्यांच्या स्थलांतरामुळे शहराच्या लोकसंख्येची घनता मोठ्या प्रमाणात वाढली त्यामुळे शहराचा विस्तार झाला. विस्ताराबरोबर जलपुरवठा, स्वच्छता, वाहतूक आणि इतर नागरी सुविधांवर ताण निर्माण झाला. साधारणतः १८७२ मध्ये शहराची लोकसंख्या १६,२३३ होती तर तेच १९४१ च्या दरम्यान ३५,७४१ इतकी झाली यावरून आपल्याला स्थलांतराचे प्रमाण दिसून येते.

## कामगार वस्त्यांची निर्मिती

INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

औद्योगीकरणामुळे कोळसा उद्योग व ऊर्जा प्रकल्प, Western Coalfields Limited ची सुरुवात, Maharashtra State Power Generation Company इत्यादी प्रकल्पाच्या वाढीमुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मितीच्या संधी निर्माण झाल्या. त्यामुळे उद्योगधंद्यात काम करणाऱ्या कामगारांची संख्या वाढली या कामगारांच्या निवाऱ्यासाठी नवीन वस्त्या निर्माण करण्यात आल्या. या वस्त्यांमध्ये पायाभूत सुविधा मर्यादित प्रमाणात उपलब्ध होत्या तरी वस्त्यांमुळे भौगोलिक विस्ताराला चालना मिळाली. पूर्वी किल्ला आणि त्या सभोवतालच्या वस्तीपुरते मर्यादित असलेले चंद्रपूर शहर तटबंदीच्या बाहेर विस्तारत गेले. औद्योगीकरणामुळे चंद्रपूर मध्ये एक नवीन कामगार वर्ग उदयास आला. कोळसा खाणी आणि उद्योगधंद्यांमध्ये काम करणारे कामगार हे शहराच्या सामाजिक रचनेत महत्त्वाचा घटक बनले या वर्गाच्या उद्यानंतर शहरात कामगार संघटना हक्कासाठी चळवळी आणि सामूहिक जाणीव वाढू लागली.

## व्यापाऱ्यांनी बाजारपेठांचा विकास

रेल्वे, पोस्ट, तारा व दूरध्वनी ही सर्व व्यापाराची शीघ्र गतीची साधने आहेत. हे सर्व साधने विसाव्या शतकातील असली, तरी चंद्रपूरच्या व्यापार हा फार जुन्या काळापासून चालू असल्याचा इतिहास सापडतो. भोसले यांच्या काळात तर नागपूरच्या खाली चंद्रपुरा व्यापारी महत्व होते. दक्षिणेतून समुद्रकिनाऱ्यावरून येणारे मीठ, सुपारी, लवंग, नारळ, विलायची, काजू, किसमिस आदि माल चंद्रपूर मार्गे नागपूरत जात असे. दक्षिण मार्गावरील चंद्रपूर हे एक मोठे व्यापारी पेठ होते. पुढील काळात औद्योगिक विकासामुळे चंद्रपूर शहरातील आर्थिक उलाढाल वाढले. कोळसा उद्योग डब्लू. सी. एल., पावर हाऊस तसेच इतर उद्योगधंद्यांमुळे व्यावसायिक व व्यापारी तसेच सेवा क्षेत्रातील लोकसंख्या वाढली. त्यामुळे विसाव्या शतकात व्यापारी मालाच्या आयात-निर्याती करता आधुनिक साधने इ. स. १९०८-९ पासून उपलब्ध झाली आणि येथील स्थानिक व बाहेरून येणाऱ्या मालास विशेष भरती आली. या सर्व प्रक्रियेमुळे शहराचा एक महत्त्वाचे व्यापारी केंद्र म्हणून विकास झाला.

## सामाजिक परिवर्तन

पूर्वीपासून मागास समजला जाणारा भाग या औद्योगिक प्रगतीमुळे विकासाच्या प्रवाहाला लागला. ब्रिटिशकालीन औद्योगीकरणामुळे चंद्रपूर शहराच्या सामाजिक रचनेत मोठ्या प्रमाणावर बदल घडून आले. औद्योगिक विकासामुळे केवळ आर्थिक क्षेत्रातच नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक आणि जीवनशैलीच्या स्तरावरही महत्त्वपूर्ण बदल झाले. औद्योगीकरणामुळे विविध प्रदेशातील रोजगाराच्या शोधात चंद्रपुरात स्तलांतरीत झाले. परिणामी चंद्रपूर शहरात विविध जाती, धर्म, भाषा आणि संस्कृतीचे लोक एकत्र राहू लागले. बहुसंस्कृतिक समाज रचना निर्माण झाली. पूर्वी ग्रामीण भागात प्रामुख्याने जातिव्यवस्थेवर आधारित सामाजिक रचना होती. परंतु शहरात विविध पार्श्वभूमीतील लोक एकत्र काम करू लागल्यामुळे सामाजिक भेदभाव काही प्रमाणात कमी होण्यास मदत झाली. औद्योगिक विकासामुळे चंद्रपूर मध्ये आधुनिक शहरे जीवनशैली विकसित होऊ लागले. शिक्षण संस्था, आरोग्य सेवा, बाजारपेठा आणि इतर सामाजिक सुविधा वाढल्या. लोकांच्या राहणीमानात कपड्यांमध्ये अन्नपद्धतीमध्ये आणि जीवनशैलीत बदल दिसून आले. पारंपारिक ग्रामीण जीवनशैलीतून आधुनिक जीवनशैलीकडे संक्रमण घडून आले.

## औद्योगिकीकरणाचे परिणाम

औद्योगिकीकरणामुळे नागरीकरणाच्या प्रक्रियेला चालना मिळाली. परंतु या प्रक्रियेचे काही सकारात्मक आणि नकारात्मक सुद्धा परिणाम दिसून येतात.

### सकारात्मक परिणाम

- रोजगारांच्या संधी निर्माण झाल्या.
- व्यापार आणि उद्योगधंद्यांचा विकास झाला.
- शहराचा विस्तार झाला.
- शहरी जीवनशैली विकसित झाली.

### नकारात्मक परिणाम

- झोपडपट्ट्यांची निर्मिती.
- पायाभूत सुविधांची कमतरता .
- पर्यावरणीय समस्या.

- सार्वजनिक आरोग्यावर परिणाम.

# निष्कर्ष

ब्रिटिशकालीन औद्योगीकरणामुळे चंद्रपूर शहराच्या नागरि विकासात महत्त्वपूर्ण बदल घडवून आले. कोळसा उद्योग, रेल्वे मार्गाचा विस्तार आणि प्रशासनिक बदल यामुळे शहराच्या आर्थिक, सामाजिक आणि भौगोलिक रचनेत परिवर्तन झाले. या प्रक्रियेमुळे चंद्रपूर शहराचे नागरी रूपांतर घडून आले. तरी या औद्योगिक विकासामुळे काही सामाजिक आणि पर्यावरणीय समस्या देखील निर्माण झाल्या. त्यामुळे नागरिकाचा अभ्यास करताना औद्योगीकरणाच्या सर्व पैलूंचा विकास करणे आवश्यक आहे.

## संदर्भ ग्रंथसूची

**प्राथमिक साधने**

**गॅझेटिअर्स**

- Central Provinces District Gazetteers, Chanda District
  Value A Descriptive Originally Printed 1909 Published By The Executive Editor and Secretary, Gazetteers Deparetent, Govt. Of Maharashtra, Bombay
- Chanda district Gazetteer, 1909.
- Chanda district Gazetteer, 1973.

**कोळसा उद्योग**

- Western Coalfields Limited Annual Reports (WCL)
- Coal Mining in Central Provinces (British records)

**दुय्यम साधने**

१ राजुरकर अ.ज ., चंद्रपुरचा इतिहास,महाकाली प्रकाशन ली □ आवृत्ती) □□□६)

२ काटकर तु.ना ., चंद्रपुर नगरपालिका शताब्दी ग्रंथ, (आवृत्ती १ ली १९६९)

३ चांदा म्युनिसिपल कमिटी : सरकाइये नोटिफिकेशन ३२५/१७ मे १८६७